# Maharashtra Animal Welfare Board

**(Established As Per Govt of Maharashtra, Department of Animal Husbandry, Dairy Development & Fisheries GR No. APA-1090/1545/CR-144/ADF-3, dated 23 May, 1991)**
**Regn No. Maha/1904/2018/Pune dated 06/12/2018**
**Address: Commissionerate of Animal Husbandry, Opp Spicer College, Aundh, Pune-41067.**
**Phone: 020-25690480, 81, 85. Email: mahaanimalwelfareboard@gmail.com**


जा.क्र. व्हीईटी/एडब्ल्युबीआय/५६८/६३८५/अ/२०१८-१९/पसं-१२,औंध, पुणे-६७, दि: ०२ /०७/२०१९

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी (सर्व)

विषय:- प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध (खटल्यातील पशु मालमत्तेची देखभाल व परिरक्षण) नियम, २०१७ अंतर्गत पकडण्यात आलेल्या पशुंचे पालन पोषण, तपासणी व परिवहनासाठी प्रति दिन मुल्य ठरविण्याबाबत

संदर्भ:- १) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० अंतर्गत प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध (खटल्यातील पशु मालमत्तेची देखभाल व परिरक्षण) नियम, २०१७
२) भारतीय जिवजंतू कल्याण बोर्ड यांचे पत्र क्र. ९-१/२०१८-१९/पिसिए/ दिनांक ३/५/२०१८
३) केंद्रिय मोटार वाहन (अकरावी सुधारणा)नियम, २०१५
४) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी मोटार वाहने नियम, १९८९ च्या नियम ६२(३) मधिल तरतुदीनुसार निश्चित केलेले दर दि. ११/३/२०१९
५) उत्तराखण्ड पशु कल्याण बोर्ड यांचे पत्र क्र. २४२९-३७/युकेडी(०४)/२०१७-१८ दि. २०/१२/२०१७

उपरोक्त विषय व संदर्भ क्र १ अन्वये केंद्र शासनाने निर्गमीत केलेली अधिसुचना प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध (खटल्यातील पशु मालमत्तेची देखभाल व परिरक्षण) नियम, २०१७ (Prevention of Cruelty to Animals (Care and Maintenance of Case Property) Rules 2017) मधील नियम क्रमांक ४ अन्वये प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० या कायद्याचे उल्लंघन करताना गुन्हयात पकडण्यात आलेल्या पशुंच्या पालन पोषण व वाहतूकीसाठी येणारा प्रती दिन खर्च निश्चित करण्याबाबत महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ यांना निर्देशित केलेले आहे.

यासाठी अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकी मध्ये झालेल्या चर्चे नुसार, गुन्हयात पकडण्यात आलेल्या पशुंच्या पालन पोषण व वाहतूकीसाठी, प्रती दिन खर्च खालिलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| पशुंचा प्रकार | बाब | दर |
|---|---|---|
| सर्व प्रकारचे पशु | आरोग्य तपासणी, टॅगींग, फ़ोटो इत्यादी | रु २०० प्रति पशु (एक वेळ) |
| | औषधोपचार, लसिकरण, जंतनाशक औषधी, गोचिडनिर्मुलन | संबंधित कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय संस्थेवर कार्यरत सहा. आयुक्त (पशुसंवर्धन)/ पशुधन विकास अधिकारी यांनी प्रमाणीत केल्यानुसार, केलेला प्रत्यक्ष खर्च |
| गाय वर्गीय प्राणी व महिष वर्गीय पशु | दैनिक पालन पोषण खर्च | रु. २०० प्रति पशु प्रति दिवस (मोठे पशु)<br>रु. १५० प्रति पशु प्रति दिवस (लहान पशु) |
| अश्ववर्गीय पशु | दैनिक पालन पोषण खर्च | रु. ३०० प्रति पशु प्रति दिवस (मोठे पशु)<br>रु. १५० प्रति पशु प्रति दिवस (लहान पशु) |

| श्वान वर्गीय पशु | दैनिक पालन पोषण खर्च<br>१. पशुचे वजन १० किलो पर्यंत<br>२. पशुचे वजन १० किलो ते २५ किलो<br>३. पशुचे वजन २५ किलो ते ४० किलो<br>४. पशुचे वजन ४० किलो चे वर | १. रु. १५ प्रति पशु प्रति दिवस<br>२. रु. ३० प्रति पशु प्रति दिवस<br>३. रु. ५० प्रति पशु प्रति दिवस<br>४. रु. ६० प्रति पशु प्रति दिवस |
|---|---|---|

गुन्हयात पकडण्यात आलेल्या पशुंच्या वाहतूकी बाबत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी मोटार वाहने [illegible] १९८९ च्या नियम ६२(३) मधिल तरतुदीनुसार खालिलप्रमाणे निश्चित केलेले दर लागू राहतील

| पशुंचा प्रकार | वाहतूक करतांना आवश्यक जागा |
|---|---|
| गाय वर्गीय प्राणी व महिष वर्गीय पशु | २ स्क्वेअर मिटर प्रति पशु |
| अश्ववर्गीय पशु | २.२५ स्क्वेअर मिटर प्रति पशु |
| श्वान वर्गीय पशु | १ स्क्वेअर मिटर प्रति पशु |

| वाहनाचा प्रकार | २४ तासाचे दर | एक लिटर इंधनामध्ये होणा सरासरी धाव कि.मी. |
|---|---|---|
| मिनीट्रक (जीव्हीडब्लू ३५०० पर्यंत) | रु. १८००/- | ९ |
| मिनीट्रक (जीव्हीडब्लू ३५०० ते ७५०० पर्यंत) | रु. २२००/- | ८ |
| ट्रक (जीव्हीडब्लू ७५०० ते १६२०० पर्यंत) | रु. ४४००/- | ४ |
| ट्रक (जीव्हीडब्लू २५००० कि.ग्रॅ.) (अंदाजे पे लोड १६ टन) टाटा, लेलँड, आयशर, मान, एएम्डब्लू व तत्सम वाहने | रु. ५०००/- | ३ |
| ट्रक (जीव्हीडब्लू ३१२०० कि.ग्रॅ.) (अंदाजे पे लोड २० टन) टाटा, लेलँड, आयशर, मान, एएम्डब्लू व तत्सम वाहने | रु. ७०००/- | ३ |

- सदर दर हे इंधन रहित आहेत. इंधन खर्च प्रत्यक्ष चालू दराने आकारावा
- १२ तासा पर्यंत कालावधी अर्धा दिवस धरावा व १२ तासां पेक्षा जास्त कालावधी झाल्यास पूर्ण दिवस म्हणू २४ तासाचे भाडे आकारण्यात यावे.

(पूनम महाजन)
अध्यक्ष, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

प्रत, आवश्यक कार्यवाहीस्तव,

१) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, (सर्व) विभाग
२) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हे (सर्व)
३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

प्रत, माहितीस्तव,

१. मा. प्रधान सचिव (पदुम), महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, गृह [illegible]

३. मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७
४. मा. पोलिस आयुक्त (सर्व)
५. मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७
६. मा. पोलिस अधिक्षक (सर्व)
७. मा. अध्यक्ष, भारतीय जिवजंतू कल्याण बोर्ड, राष्ट्रीय पशु कल्याण संस्थान कॅंपस, सिकरी, बल्लभगढ, जिला फ़रिदाबाद, हरियाणा